आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
६ जानेवारी २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- दर्पण दिनानिमित्त मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांना सर्वत्र अभिवादन

- पश्चिम रेल्वे १८ डब्यांच्या उपनगरी गाड्यांची चाचणी जानेवारीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात करणार

- माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांच्या पार्थिवावर आज पुण्यात अंत्यसंस्कार होणार

**आणि**

- महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या निवडणुकीला मुंबई उच्च न्यायालयाची स्थगिती

**<><><><><>**

राज्यभरात आज दर्पण दिन साजरा होत आहे. मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी वृत्तपत्र सुरू केल्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. या निमित्ताने पत्रकारिता महाविद्यालयांसह विविध संस्था संघटना विविध कार्यक्रम आयोजित करत दर्पण दिन साजरा करत आहेत, तसंच बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन करत आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन केलं असून, राज्यातल्या पत्रकारांना शुभेच्छा दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही बाळशास्त्री जांभेकरांना अभिवादन केलं. जांभेकरांनी मराठी पत्रकारितेचा पाया भक्कमपणे उभारण्यासाठी मोलाचं कार्य केलं असं ते म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांची अनेक पत्रकार आणि संपादकांनी दर्पण दिनानिमित्त भेट घेतली. यावेळी पवार यांनी सर्व पत्रकारांना शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सर्व पत्रकारांना दर्पण दिनाच्या शुभेच्छा दिल्या. आपल्या लेखणीतून वास्तव घटनांचं अचूक चित्रण करणं आणि समाजातल्या अनैतिक, अन्यायी प्रवृत्तीवर प्रहार करणाऱ्या पत्रकारितेचा वारसा आपल्या देशाला लाभला आहे, असं पवार म्हणाले.

अहिल्यानगर प्रेस क्लबच्या वतीनेही आज दर्पण दिन साजरा करण्यात आला.

**<><><><><>**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी राजकीय पक्षांचा प्रचार जोरात सुरु असून निवडणूक आयोग आणि प्रशासनाचीही तयारी सुरु आहे. मतदारांमधे मतदानविषयक जागृतीसाठी विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. तर मतदान आणि मतोजणीसाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

मुंबईत महानगरपालिकेनं ७ विविध ठिकाणी प्रत्येकी ३ प्रशिक्षण सत्रं आयोजित केली आहेत. निवडणूक प्रक्रिया सुलभ आणि पारदर्शी व्हावी याकरता यंत्रसामुग्री आणि कार्यवाहीबद्दल सविस्तर मार्गदर्शन कर्मचाऱ्यांना देण्यात येत आहे.

अहिल्यानगरमधे स्वीप समितीने मतदान विषयक जनजागृतीच्या कार्यक्रमांचा आराखडा आणि अहवाल निवडणूक निरीक्षकांना सादर केला. त्यात शोभायात्रा, प्रदर्शनं, पथनाट्य, विविध स्पर्धा इत्यादींचा समावेश होता.

जळगाव महानगरपालिकेत एकूण ५१६ मतदान केंद्रांपैकी १५७ संवेदनशील असून त्यावर पोलिसांचं विशेष लक्ष राहील. ५७ केंद्रांवर बॅरिकेडींग करण्यात येणार असल्याची माहिती विभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. शहरातून ९१ जणांना १५ दिवसांकरता तडीपार करण्याचे आदेश प्रांताधिकाऱ्यांनी दिले आहेत. मतदान प्रक्रियेदरम्यान काही गोंधळ होऊ नये, यासाठी अनेक केंद्रांवर सीसीटीव्ही आणि व्हिडिओ कॅमेऱ्यांची नजर राहणार आहे.

दरम्यान, प्रचाराला जोर आला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात तसंच मराठवाड्यातल्या शहरांमधे प्रचारसभा घेतल्या.

**<><><><><>**

सी आर एस अर्थात नागरी नोंदणी प्रणाली सॉफ्टवेअर नोंदणीत अनियमितता आढळल्याप्रकरणी राज्य सरकारने एका विशेष तपास पथकाची नियुक्ती केली आहे. तेराशे लोकसंख्या असलेल्या यवतमाळ जिल्ह्यातल्या शेंदूरसनी या  गावात जन्म आणि मृत्यूच्या २७ हजार नोंदी आढळल्याचं प्रकरण उघडकीस आलं होतं, या प्रकरणी हा तपास केला जाईल. हे पथक या आठवड्यात शेंदूरसनी इथं भेट देईल, आणि नोंदणी प्रणालीत काय चूक झाली याचा शोध घेईल.

या प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून याचा तपास यवतमाळ पोलीस करत आहेत.

<><><><><>

विद्यार्थ्यांना परीक्षेशी संबंधित ताणतणाव हाताळण्यास मदत व्हावी यासाठी सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने समुपदेशन सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यावर्षी या सेवेचा पहिला टप्पा १७ फेब्रुवारी ते १ जूनपर्यंत राबवला जाणार आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेशी संबंधित ताणतणाव, वेळेचं व्यवस्थापन तसंच इतर भावनिक तणावांना सामोरं जाता यावं यासाठी त्यांना मार्गदर्शन करणं हा या उपक्रमाचा हेतू आहे. १ ८ ० ० १ १ ८ ० ० ४ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून विद्यार्थी मदत मिळवू शकतात. याद्वारे प्राचार्य, शिक्षक, समुपदेशक, तसंच मानसोपचार तज्ज्ञांचं मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यातले ६१ समुपदेशक हे भारतातले तर बारा जण नेपाळ, संयुक्त अरब अमिराती, जपान आणि कतारमधले आहेत.

<><><><><>

१८ डब्यांच्या उपनगरी गाड्यांची चाचणी जानेवारीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात मध्यात करण्याचा निर्णय पश्चिम रेल्वेनं घेतला आहे. मुंबई उपनगरीय रेल्वेत बहुतेक गाड्या या १२ डब्यांच्या आहेत, तर मध्य आणि पश्चिम मार्गावर १५ डब्यांच्या गाड्याही धावतात. आता विरार ते डहाणू या टप्प्यात १८ डब्यांच्या दोन उपनगरी गाड्यांची चाचणी १४ आणि १५ जानेवारी रोजी होणार आहे. यात, आपत्कालीन परिस्थितीत गाडी किती लवकर थांबू शकते, हे तपासण्यासाठी ईबीडी, तर ब्रेक लावताना कपलरवर पडणारा दबाव तपासण्यासाठी सीएफ अशा दोन चाचण्या केल्या जाणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. कोणतीही नवी गाडी सुरू करण्यापूर्वी या दोन चाचण्या करणं अनिवार्य आहे.

<><><><><>

नवी दिल्लीतल्या विज्ञान भवनात सीएसआर परिषदेचं उद्घाटन आज केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते होणार आहे. 'पोषण सुरक्षा आणि कुपोषण निवारणामध्ये सामाजिक उत्तरदायित्व निधीची भूमिका' या विषयावरच्या या परिषदेत मुलांमधल्या कुपोषणाचा सामना करण्यासाठी सहयोगी, नाविन्यपूर्ण आणि शाश्वत धोरणांवर विचारमंथन होणार आहे. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळानं या परिषदेचं आयोजन केलं आहे. या परिषदेदरम्यान अमित शाह यांच्या हस्ते शिशु संजीवनी उपक्रमाचं उद्घाटन करण्यात

येणार असून त्याद्वारे महाराष्ट्रात नागपूर जिल्ह्यातल्या अंगणवाडी केंद्रांमध्ये शिकणाऱ्या सुमारे तीन हजार मुलांना पौष्टिक आहार प्रदान करण्यात येणार आहे.

<><><><><>

माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांच्या पार्थिवावर आज पुण्यात अंतिम संस्कार होणार आहेत. आज पहाटे त्यांचं निधन झालं. ते ८२ वर्षांचे होते. भारतीय हवाई दलात वैमानिक म्हणून सेवा बजावताना त्यांनी १९६५ आणि १९७१ च्या युद्धात प्रत्यक्ष भाग घेतला होता. निवृत्तीनंतर ते राजकारणात सक्रीय झाले. १९८२ ते १९९६ अशी सलग १४ वर्षं, आणि नंतर १९९८ ते २००४ या कालावधीत ते राज्यसभेचे सदस्य होते. १९९६ मधे लोकसभेत निवडून गेले होते. काँग्रेसच्या सत्ताकाळात त्यांनी रेल्वे खात्याचं मंत्रीपद सांभाळलं.

ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्षही ते होते. राष्ट्रकुल स्पर्धांच्या आयोजनात भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने त्यांच्या राजकीय कारकिर्दीला धक्का बसला होता. गेल्या वर्षी सक्तवसुली संचालनालयाने दिलेल्या अहवालानंतर त्यांची आरोपातून मुक्तता झाली होती.

पुणे शहराच्या सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्राला नवी दिशा देण्यात कलमाडी यांचा मोलाचा वाटा होता. पुणे फेस्टिव्हल आणि पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनसारख्या उपक्रमांची सुरुवात करून त्यांनी पुण्याला राष्ट्रीय स्तरावर वेगळी ओळख मिळवून दिली.

कलमाडी यांच्या निधनाबद्दल ज्येष्ठ नेते शरद पवार तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

ग्रामीण भागात रोजगाराची हमी देणारी जी राम जी योजना केंद्र सरकारतर्फे राबवण्यात येत आहे.

या योजनेतल्या तरतुदी गावाचा शाश्वत विकास साधण्यात मैलाचा दगड ठरतील, असं मत वाशिम इथले प्रशिक्षक आणि लेखक रविंद्र इंगोले यांनी व्यक्त केलं.

- **- होल्ड - बाईट - - रविंद्र इंगोले - -**

- <><><><><>

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या आज होणाऱ्या निवडणुकीला काल मुंबई उच्च न्यायालयानं पुढच्या आदेशापर्यंत स्थगिती दिली. या निवडणुकीत घराणेशाही आणि

पक्षपात होत असल्याचा आरोप झाला होता. विद्यमान अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या नातेवाईकांसह ४०० नव्या सदस्यांना संघटनेत घेण्याच्या प्रक्रियेवर मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठानं प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आणि निवडणूक प्रक्रियेत न्यायालयानं दखल देण्याची गरज असल्याचं मत मांडलं. सर्व संबंधित पक्षांनी ३ फेब्रुवारीपर्यंत शपथपत्राद्वारे उत्तर द्यावं, असे निर्देश न्यायालयानं दिले. या प्रकरणाची पुढची सुनावणी ४ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

**<><><><><>**

येत्या १८ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस स्पर्धेच्या बक्षिसाच्या रकमेत वाढ करण्यात आल्याचं स्पर्धेच्या आयोजकांनी आज घोषित केलं. त्यानुसार २०२६ च्या हंगामातल्या पहिल्याच स्पर्धेत बक्षिसाची रक्कम ११ कोटी १५ लाख ऑस्ट्रेलियन डॉलर्स इतकी असेल.

पात्रता स्पर्धेच्या बक्षिस रकमेत १६% वाढ होईल, तसंच सर्व प्रमुख एकेरी आणि दुहेरी सामन्यांच्या खेळाडूंना मिळणाऱ्या बक्षिसाच्या रकमेत कमीतकमी १० टक्के वाढ होईल, असं यात म्हटलं आहे.

**//<><><><><>//**